POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र


○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-२९१ ● मुंबई, रविवार, २४ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

वांद्रे पूर्वेतील गरीब नगरच्या अनधिकृत झोपडपट्ट्यांवरील कारवाई पूर्ण



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

वांद्रे पूवेर्तील गरीब नगरमधील अनधिकृत झोपडपट्टीवरील तोडक कारवाई पूर्ण झाली आहे. मागील चार दिवसांपासू सलग सुरू असलेली कारवाई शनिवारी पूर्ण झाल्याची माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनानं दिली. या कारवाईवेळी एकून 5 हजार 300 चौ.मी. जागेवरील 400 हून अधिक झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या.

अनधिकृत झोपड्यांवरील तोडक कारवाई ही पश्चिम रेल्वेच्या आरपीएफ आणि जीआरपी जवानांनकडून एकत्रितपणे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान दगडफेकीची घटना घडली होती. मात्र पोलिसांनी संबंधितांवर केलेल्या सोम्या लाठीचार्जनंतर परिस्थिती नियंत्रणात आली.

मुंबईतील वांद्रे पूर्व परिसरात असलेल्या गरीब नगरमधील अनधिकृत झोपडपट्टीवर पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली. मंगळवार 19 मे पासून सुरू झालेली कारवाई शुक्रवार 22 मेपर्यंत सुरू होती. अखेर अनधिकृत झोपड्यांवरूल तोडक कारवाई पूर्ण झाल्यानंतर आज पाडकाम केलेला मलबा बाजूला काढण्याची काम सुरू झाल्याची माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनानं दिली.

ही कारवाई सुरू असताना या कारवाईला विरोध करण्यासाठी याठिकाणी काही जणांनी पोलिसांवर बाटल्या आणि इतर वस्तू फेकल्या. त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज करत या ठिकाणी जमलेली गर्दी हटवली. दरम्यान, या कारवाईवेळी या ठिकाणी जमलेली लोकांची गर्दी पाहता पोलिसांना अतिरिक्त बळ बोलवावं लागलं होतं. तसेच या ठिकाणी पोलिसांचे दंगल विरोधी पथकही दाखल तैनात करण्यात आले होते.

नेमकं काय आहे प्रकरण ?

वांद्रे रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या पश्चिम रेल्वेच्या जागेवर अनधिकृत झोपड्यांच्या माध्यमातून अतिक्रमण करण्यात आलं होतं. हे अतिक्रमण अगदी रेल्वे स्टेशनला लागूनच होतं. या आधी 27 नोव्हेंबर 2017 रोजी हे अतिक्रमण हटवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, त्यावेळी काही जणांनी त्याच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी नऊ वर्षे सुनावणी सुरू होती. त्यानंतर 26 एप्रिल 2026 रोजी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पात्र बांधकामांना संरक्षण देण्यात आलं, तर अनधिकृत अतिक्रमणे हटवण्यास मंजुरी देण्यात आलं. न्यायालयाच्या या आदेशानंतर पश्चिम रेल्वेने अतिक्रमण कारवाई सुरू करत जवळपास 400 हून अधिक झोपड्या पाडल्या. या झोपड्यामुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेची समस्या निर्माण झाला होता. या परिसरात जमलेल्या कचऱ्यामुळे आगीच्याही घटना सातत्यानं घडत होत्या.

वांद्रे रेल्वे स्थानकाने घेतला मोकळा श्वास
400 हून अधिक झोपड्या जमीनदोस्त

वांद्रे पूवेर्तील गरीब नगरमधील अनधिकृत झोपडपट्टीवरील तोडक कारवाई 100 टक्के पूर्ण झाल्याची माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनाने शनिवारी दिली. या कारवाई अंतर्गत एकूण 5 हजार 300 चौ.मी.जागेवरील 400 हून अधिक झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या. मंगळवार ते शुक्रवार असे सलग 4 दिवस बेकायदा बांधकामे तोडून रेल्वेची जागा मोकळी करण्यात आली आहे. शनिवारपासून या मोकळ्या झालेल्या जागेवर फेन्सिंगचे काम सुरु करण्यात आल्याची माहिती पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिली. गेल्या 4 दिवसांपासून अतिक्रमणविरोधी कारवाई शांततेत पार पडली असली तरी, रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) यांचा बंदोबस्त पुढील 7 ते 8 दिवस कायम ठेवण्यात येणार आहे. वांद्रे पूर्वेकडील पश्चिम रेल्वेच्या जागेवर वसलेल्या बेकायदा झोपड्या हटवल्यानंतर येथे वांद्रे रेल्वे टर्मिनसचा विस्तार करण्यात येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. येथे तीन ते चार मजली झोपड्या उभ्या करण्यात आल्या होत्या. या सर्व झोपड्या हटवण्यात आल्या आहेत. शिवाय अधिकृत 100 घरांच्या तळघरावरचे अनधिकृत मजले मशीनचा वापर न करता हाताने पाडले जात आहेत. त्याची ही 50 टक्के कारवाई पूर्ण झाली आहे. झोपड्या तोडल्यानंतर लाकडी फळ्या व लोखंडी पत्रे यांचे अस्ताव्यस्त ढीग स्टेशनच्या बाहेर जमा झाले आहेत. हे सर्व ढीग उचलण्यात येत आहे. त्यानंतर मोकळ्या झालेल्या जागेभोवती फेन्सिंग घालून कंपाउंड उभारले जाणार आहे. निष्कासित झोपडीधारकांकडून पुन्हा येथे घरे बांधली जाऊ नयेत यासाठी विशेष काळजी रेल्वे प्रशासन घेणार असल्याचेही सांगण्यात आले. अधिकार्यांनी दिलेल्या माहितीनुसार या कारवाईविरोधात रहिवाशांनी दुर्सयांदा न्यायालयाचे दार ठोठावले होते. दि. 21 मे रोजी तोडक कारवाईला स्थगिती मिळावी यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळून लावली.

पुणे मेट्रोच्या डब्यात पाणीच पाणी
मुसळधार पावासमुळे पाणी साचले नाही तर अधिकाऱ्यांचा आश्चर्यकारक खुलासा



वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

उत्तर पुणे जिल्ह्याच्या शिरूर आंबेगाव खेड जुन्नर तालुक्यातील अनेक गावांना आज वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झोडपले. विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी गारपिट देखील झाली. वादळी वाऱ्याच्या या मुसळधार पावसाने अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली असून विद्युत वाहक खांब तसेच फळबाग ही जमीन दोस्त झाल्या आहेत. वादळी वाऱ्याच्या या पावसाने शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल असून उकड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मात्र दिलासा मिळाला आहे. मात्र या मान्सूनपूर्व पावसाने खरिप हंगामापुर्वीच्या शेती मशागतीच्या कामांना आता वेग येणार आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

पुणे शहरासह पुणे जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले आहे. पावसामुळे सर्वत्र पाणी साचले. मोठी वाहतूक कोंडी झाली. याचा जबरदस्त फटका वाहनचालकांना बसला. वाहनचलाकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. त्यातच मेट्रोने प्रावस करणाऱ्या प्रवाशांना देखील पावसामुळे त्रास सहन करावा लागला. पुणे मेट्रोच्या डब्यात पाणी साचले होते. मेट्रोच्या छतातून पाणी गळती होत होती असं प्रवाशांकडून सांगण्यात आले. याचे व्हिडिओ देखील व्हायरल झाले होते. मात्र, मेट्रोच्या डब्यात पाणी मुसळधार पावसामुळे साचले नाही. याबाबत मेट्रो प्रशासाने खुलासा केला आहे. रेल्वे प्रशानाचे उत्तर ऐकून प्रवासी अचंबीत झाले.

22 मे रोजी पुण्यात झालेल्या मुसळधार पावसानंतर पुणे मेट्रोचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये मेट्रोच्या डब्याच्या वरच्या छतामधून पावसाचे पाणी गळत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पावसाचे पाणी थेट मेट्रोच्या आत येत होते. प्रवाशांमध्ये यामुळे नाराजी व्यक्त केली जात असून, नव्याने सुरू झालेल्या मेट्रो सेवेतच अशा प्रकारची घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या प्रकरणावर पुणे मेट्रोचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी चंद्रशेखर तांबवेकर यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. 21 मे 2026 रोजी संध्याकाळी 6.40 वाजता लाइन-2 वरील रामवाडी स्टेशन येथे ट्रेन सेट-5 मध्ये मेट्रोच्या डब्यात पाणी साचल्याचा प्रकार समोर आला होता. हे पाणी पावसाचे नव्हते, तर HVAC ड्रेन चोक झाल्यामुळे ही समस्या निर्माण झाली. धुळीमुळे ड्रेनेजपाइपमध्ये अडथळा आल्याने एसीमधून तयार होणारे कंडेन्सेशनचे पाणी बाहेर पडू शकले नाही आणि कोचमध्ये हे पाणी साचले असं स्पष्टीकरण तांबवेकर यांनी दिले. ट्रेन ऑपरेटरकडून ही बाब तात्काळ रिपोर्ट करण्यात आल्यानंतर संबंधित लश्अउ युनिट बंद करण्यात आले आणि स्थिती नियंत्रणात आणण्यात आली.प्रशासनाने ही घटना तांत्रिक स्वरूपाची असल्याचे सांगत अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

कोकणासह पुणे, नाशिक, सोलापूर, सातारा, अहिल्यानगरमध्ये मुसळधरा पाऊस

राज्यात शुक्रवारी मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. कोकणासह पुणे, नाशिक, सोलापूर, सातारा, अहिल्यानगरमध्ये पाऊसधारा बरसल्या आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची काहीशी तारांबळ उडाली असली तरी वाढत्या उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. पुण्यात तर काहीशी पावसातच रस्ते जलमय झाले होते. नाशिकच्या येवल्यात सलग दोन दिवस मान्सूनपूर्व पाऊस कोसळला. यामध्ये अनेक घरांचं नुकसान झालं होते.

उष्णतेने महाराष्ट्र होरपळला
राज्यात मार्चपासून उष्माघाताचे २२६ रुग्ण



■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात सध्या उन्हाची तीव्र लाट पसरली असून उष्माघाताच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मार्च ते २० मे या अडीच महिन्यांच्या कालावधीत राज्यातील उष्माघाताच्या रुग्णांची एकूण संख्या २२६ वर पोहोचली आहे. विशेषतः मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात केवळ चार दिवसांत तब्बल १७१ जणांना उष्माघाताचा फटका बसल्याने राज्यातील परिस्थिती गंभीर बनली आहे. उन्हाच्या या तीव्र लाटेमुळे राज्यात ६ संशयित मृत्यूंची नोंद झाली असून अंतिम अहवालानंतर यावर शिक्कामोर्तब होईल.

लाटेचा सर्वाधिक फटका संभाजीनगरला बसला असून तेथे सर्वाधिक ४१ रुग्णांची नोंद झाली. नंदुरबारमध्ये २४, नाशिकमध्ये १९, बुलढाण्यात १७, अमरावतीत १६ तर वर्ध्यात १४ रुग्ण आढळले. मुंबईत तापमान वाढत असले तरी उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नाही.

लातूरच्या 'ट्युशन एरिया'वर प्रशासनाचा मोठा घाव
अनधिकृत व्यवसाय बंद करण्याचे आदेश

■लातूर। प्रतिनिधी,

लातूरच्या शिक्षण व्यवसायावर आता प्रशासनाने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणानंतर निर्माण झालेल्या संशयाच्या वातावरणात जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला असून, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी (ट्युशन एरिया) परिसरातील उत्पादन व्यवसायाव्यतिरिक्त सुरू असलेले सर्व अनधिकृत व्यवसाय तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून एमआयडीसी परिसरात नियमांना हरताळ फासत खासगी ट्युशन क्लासेस, हॉस्टेल्स, वसतिगृहे, खानावळी तसेच विविध कमर्शियल कार्यालयांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला होता. औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यात आलेल्या परिसराचे हळूहळू ''एज्युकेशन हब''मध्ये रूपांतर झाल्याची चर्चा होती. आता मात्र जिल्हा उद्योग केंद्राने स्पष्ट भूमिका घेत ''उत्पादन व्यवसायाव्यतिरिक्त अन्य कोणताही व्यवसाय चालणार नाही,'' असा इशारा दिला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारी, वाढती वाहतूक कोंडी, बेकायदेशीर बांधकामे तसेच नीट पेपरफुटी प्रकरणानंतर निर्माण झालेला दबाव यामुळे प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे बोलले जात आहे. या कारवाईमुळे एमआयडीस परिसरात वर्षानुवर्षे शिक्षण व संबंधित व्यवसायातून मोठी आर्थिक उलाढाल करणारे अनेक व्यावसायिक प्रशासनाच्या रडारवर आले आहेत. हॉस्टेल व्यवसाय, खानावळी, भाडेव्यवसाय आणि कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याची चर्चा असून, आता या व्यवहारांची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या नावाखाली सुरू असलेल्या व्यावसायिक व्यवस्थांवर प्रशासनाचे लक्ष केंद्रीत झाल्याचे संकेत मिळत आहेत. प्रशासनाने स्पष्ट इशारा देत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असे म्हटले आहे. अनधिकृत व्यवसाय त्वरित बंद करून आदेशांचे पालन करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. लातूर एमआयडीस परिसरात नेमके कोणते व्यवसाय सुरू होते, त्यांना कोणाचे पाठबळ होते आणि पुढील कारवाईची दिशा काय असेल, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



गडचिरोलीत माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्धवस्त

■मुंबई। प्रतिनिधी,

गडचिरोली पोलिसांनी माओवाद्यांविरुद्ध मोठे यश मिळवले आहे. त्यांनी जंगलात कार्यरत असलेला माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना पूर्णपणे उद्धवस्त केला आहे. जमिनीखाली लपवलेले माओवादी साहित्य आणि मोठ्या प्रमाणात स्फोटकेही घटनास्थळीच जप्त करून नष्ट करण्यात आली. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही संपूर्ण कारवाई करण्यात आली.

माओवादी सरकारविरोधी कारवायांसाठी आणि सुरक्षा दलांना हानी पोहोचवण्यासाठी विविध प्रकारची शस्त्रे तसेच दारुगोळा वापरत असत. सुरक्षा दलांचे लक्ष टाळण्यासाठी ते या वस्तू जंगलात जमिनीखाली लपवून ठेवत असत. निवडणुकांसारख्या विशेष प्रसंगी सुरक्षा दलांवर हल्ला करण्यासाठी माओवादी अनेकदा या साहित्याचा वापर करत असत. गडचिरोली जिल्ह्यात माओवाद आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे आणि गडचिरोली पोलीस जंगलात लपवलेले हे साहित्य शोधण्यात सातत्याने यश मिळवत आहेत.

या कारवाईचा तपशील देताना पोलिसांनी सांगितले की, ह्यऑपरेशन अंतिम प्रहारह्ण अंतर्गत 16 मे रोजी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांची कसून चौकशी करण्यात आली. या चौकशीदरम्यान माओवाद्यांनी बिनागुंडा परिसरातील जंगलात शस्त्रनिर्मितीचा कारखाना आणि इतर उपकरणे लपवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ही माहिती मिळताच 21 मे रोजी गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वाखालील बॉम्ब निकामी पथकाच्या 2 तुकड्यांसह विशेष कृती दलाच्या 6 संयुक्त तुकड्यांना शोधासाठी जंगलात पाठवण्यात आले.

दुसऱ्या दिवशी 22 मे रोजी विशेष कृती दलाने बिनागुंडाचा उत्तरेकडील जंगल परिसर सील केला आणि बॉम्ब निकामी पथकाच्या मदतीने शोधमोहीम राबवली. या प्रक्रियेत, पोलिसांनी जमिनीखालून स्फोटक सामग्रीसह एक लेथ मशीन, बीजीएल पाईप, 12-बोर पाईप, एक इन्व्हर्टर, एक जनरेटर, बॅटरी, ग्राइंडिंग आणि ड्रिलिंग मशीन, एक जिग सॉ, एक प्रेशर पंप, सोलर पॅनेल आणि सुमारे २० फूट लांबीचा एक फुटबॉल पाईप जप्त केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, घटनास्थळी सापडलेल्या या सर्व वस्तू जवानांच्या मदतीने जागीच नष्ट करण्यात आल्या.

वॉशिंग पावडर आणि टूथपेस्टने भरलेल्या ट्रकमध्ये सापडला 702 किलो गांजा

■गोंदिया। प्रतिनिधी,

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या मुंबई युनिटने अंमली पदार्थांच्या आंतरराज्यीय तस्करीचे एक मोठे रॅकेट उद्धवस्त केले आहे. एका गुप्त माहितीच्या आधारे एनसीबीच्या पथकाने महाराष्ट्रातील गोंदिया येथे छापा टाकला आणि एका ट्रकमधून सुमारे 702 किलोग्राम गांजा जप्त केला आहे. तसेच या तस्करी प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांची ओळख प्रकाश एम.डी. आणि पदमलाल एन.एम. अशी पटली आहे. विश्वसनीय सुत्रांकडून गुप्त माहिती मिळाल्यानंतर 21 मे रोजी रात्री उशिरा ही संपूर्ण कारवाई पार पडली.

एनसीबीच्या तपासात असे उघड झाले की, तस्करांनी गांजाचा मोठा साठा लपवण्यासाठी अत्यंत अनोखी शक्कल लढवली होती. महाराष्ट्र नोंदणी क्रमांक असलेल्या एका ट्रकमध्ये वॉशिंग पावडर, टूथपेस्ट आणि हेअर डाय (केसांना लावायचा रंग) यांसारख्या दैनंदिन वापरातील वस्तूंची पाकिटे भरण्यात आली होती. या कायदेशीर मालाच्या आड 100 पाकिटांमध्ये गांजा लपवून ठेवला होता. सखोल चौकशीदरम्यान, अटक केलेल्या आरोपींनी कबूल केले की, अंमली पदार्थांचा हा मोठा साठा ओडिशा राज्यातून आणला जात होता. ओडिशा हे राज्य देशांतर्गत बेकायदेशीर गांजाच्या पुरवठ्याचे एक प्रमुख केंद्र म्हणून



उदयास आले आहे. जप्त करण्यात आलेल्या या अंमली पदार्थांची किंमत अंदाजे 3 कोटी रुपये इतकी आहे.

एनसीबीने दिलेल्या माहितीनुसार, हा गांजा महाराष्ट्रातील अनेक प्रमुख शहरांमध्ये कार्यरत असलेल्या अंमली पदार्थ तस्कर टोळ्यांना पुरवण्यासाठी आणला गेला होता. हा साठा नागपूर, गोंदिया, पुणे आणि मुंबई येथील अंमली पदार्थ माफियांना पोहोचवला जाणार होता. अटक केलेले तस्कर गेल्या बऱ्याच काळापासून ओडिशातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गांजाची तस्करी करत होते. तपासात असेही निष्पन्न झाले की, विविध शहरांमधील अंमली पदार्थ तस्कर टोळ्या संगनमताने काम करत होत्या. स्वतंत्रपणे आणि वैयक्तिकरीत्या गांजाचे वेगवेगळे साठे मागवण्याऐवजी, खर्च वाचवण्यासाठी आणि पकडले जाण्याचा धोका कमी करण्यासाठी ते एकत्रितपणे एकाच मोठ्या साठ्याची मागणी करत असत. हा साठा अखेरीस महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमधील विविध शहरांमधील स्थानिक विक्रेत्यांना आणि ग्राहकांना किरकोळ प्रमाणात विकला जाणार होता.

एनसीबीने गेल्या दोन महिन्यांपासून अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई करत आहे. यापूर्वी, 11 एप्रिल रोजीही या संस्थेने अशाच प्रकारची एक कारवाई करत 210 किलोग्राम गांजा जप्त केला होता आणि चार आरोपींना अटक केली होती. त्या वेळीही या तस्करांची कार्यपद्धती अगदी तशीच होती. ओडिशातून आणला जाणारा गांजा आरोपींनी लोखंडी पत्र्यांच्या मध्ये लपवून ठेवला होता.

हत्येच्या आरोपात 4 वर्ष फरार
विदेशी पिस्तुलांची तस्करी करताना तिघांना मुंबईत अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील अवैध शस्त्र तस्करीविरोधात पोलिसांनी मोठे यश मिळवले आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने सापळा रचून तीन शस्त्र तस्करांना अटक केली. हे तिघेही विदेशी पिस्तूल तसेच जिवंत काडतुसे मुंबईत घेऊन आले होते. गुन्हे शाखेने त्यांच्याकडून तीन आधुनिक विदेशी पिस्तूल, मॅगझिन आणि 45 जिवंत काडतुसे जप्त केली. यानंतर तपासात समोर आले की, अटक केलेल्या आरोपींपैकी दोघे जण हे हत्येच्या प्रकरणात सहभागी असून गेल्या 4 वर्षांपासून फरार होते. पोलिस उपायुक्त (डिटेक्शन) राज तिलक रोशन यांनी माहिती दिली की, गुन्हे शाखेला त्यांच्या गुप्तचर सूत्रांकडून एक ठोस आणि विश्वसनीय माहिती मिळाली होती. ही माहिती अशी होती की, काही लोक परवाना नसलेली विदेशी शस्त्रे विकण्याच्या उद्देशाने मुंबईत येत होते. हा मोठा शस्त्रांचा करार 22 मे रोजी रात्री सुमारे 10.45 वाजता सीएसएमटी स्टेशनजवळील सेंट जॉर्ज हॉस्पिटलजवळ होणार होता. हे ठिकाण ईस्टर्न फ्रीवेकडे जाणाऱ्या पी.डी.



मेलो रोडवरील एका सार्वजनिक शौचालयाजवळ आहे. पोलिसांना अचूक ठिकाण कळताच खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक घनश्याम नायर यांनी आपल्या पथकासह साध्या वेशात त्या ठिकाणी घेराव घातला. शस्त्रांचा करार पूर्ण करण्यासाठी तिन्ही आरोपी घटनास्थळी पोहोचताच जवळच तैनात असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांना पळून जाण्याची कोणतीही संधी न देता अटक केली. जेव्हा तपास पथकाने त्यांची कसून चौकशी केली. तसेच, त्यांच्या पार्श्वभूमीचा तपास केला, तेव्हा एक धक्कादायक खुलासा झाला. तपासात असे आढळून आले की, आरोपींपैकी दोघे 2022 मधील एका हत्येच्या प्रकरणातील मुख्य संशयित होते आणि तेव्हापासून ते फरार होते.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

झुरळ आणि बोध

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या वक्तव्याचा विदेशात बसलेल्या एका भारतीय (महाराष्ट्रातील) युवकाने हवा तसा अर्थ लावून वाईट वाटून घेतले आणि त्यानंतर नवा पक्ष स्थापन केला. ४-५ दिवसांत अनुयायांच्या संख्येत भाजपलाही मागे टाकणाऱ्या नव्या पक्षाच्या उदयाच्या चर्चा जगभरात होऊ लागल्या. १५ मे या दिवशी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बनावट पदव्यांच्या आधारे नोकऱ्या मिळवणाऱ्या युवकांना उद्देशून वक्तव्य केले, ज्यात त्यांनी अशा युवकांना 'कॉकरोच' अर्थात् झुरळ संबोधले. याचा वेगळा अर्थ घेतला गेल्याविषयी त्यांनी स्पष्टीकरणही दिले. याच कालावधीत बेरोजगार युवकांना 'झुरळ' म्हटल्यावरून त्यांच्या विरोधात सामाजिक माध्यमांतून मोठ्या प्रमाणात टीका झाली आणि त्यातूनच लंडनमधील बॉस्टन विद्यापिठातील अभिजित दिपके या युवकाने 'कॉकरोच जनता पार्टी' या नावाच्या निवडणूक न लढवणाऱ्या पक्षाची स्थापना केली. सरन्यायाधिशांच्या वक्तव्यापासून चालू झालेले हे वावटळ अवघ्या शंभर घंट्यांत देशविरोधी शक्तींच्या हातातील साधन कसे होते? हे घटनाक्रम जाणून घेतल्यास लक्षात येईल. रातोरात बनलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या संकेतस्थळावर या पक्षाचे घोषणापत्र प्रसारित झाले. कथित 'सामान्य अंसतोषातून जन्मलेल्या या पक्षाला कुणीही प्रायोजक नाही, कुणाचीही देणगी नाही' असे लिहिलेले आहे. 'बेरोजगार, आळशी, दिवसातील अधिक वेळ सामाजिक माध्यमांवर ऑनलाईन रहाणारे आणि व्यावसायिकदृष्ट्या एखाद्यावर कठोर टीका करणारे' अशी या पक्षातील सदस्यांची 'पात्रता' आहे. या पक्षाचे सदस्य होण्यासाठीचे आवाहन केल्यावर अवघ्या ४-५ दिवसांत १ कोटी ३० लाखांहून अधिक जणांनी नोंदणी केली. भाजपला जे करण्यासाठी दशकांचे कष्ट लागले, ते 'कॉकरोच जनता पार्टी'ने अल्प दिवसांत करून दाखवल्यानेही प्रसारमाध्यमांमध्ये याविषयी 'प्राईम टाइम' चर्चासत्रे झडत आहेत. भारतात नको ते उगवणारे तण काढण्यासाठी 'कॉकरोच जनता पार्टी'च्या 'एक्स' खात्यावर कारवाई करून ते बंद करण्यात आले खरे; परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणात अनुयायांची संख्या पोचली ती कशी? याचा मागोवा घेणे, महत्त्वाचे ठरते. अल्पावधीत अनुयायांची संख्या वाढवण्यासाठी 'बॉट' प्रणालीचा वापर केला जातो, हे सर्वश्रुत आहे. अर्थात्च त्यासाठी पैसे ओतावे लागतात. मध्यंतरी सामाजिक माध्यमांवर एखादी माहिती पसरवण्यासाठी, 'व्ह्यूज'ची आकडेवारी वाढवण्यासाठी एका ठिकाणी अनेक भ्रमणभाष चालू ठेवले जात असल्याचे कुठल्याशा देशात समोर आले होते. त्यातच अनेक सामाजिक माध्यमांची मुख्य कार्यालये आणि त्यांचे 'डेटा सेंटर्स' विदेशी शक्तींच्या हातात आहेत. ही संख्या तांत्रिकदृष्ट्या जाळ्यामुळे वाढवल्याची शक्यता अधिक आहे; कारण 'सनातन प्रभात'सारख्या निःस्वार्थी आणि समाज, देशहितैषी माध्यमांच्या अनुयायांच्या संख्येत साम्यवादी 'अल्गोरिदम'मुळे वाढ होतांना दिसत नाही. दुसरे म्हणजे या पक्षाचा संस्थापक असलेला अभिजित दिपके हा आम आदमी पक्षाचा कार्यकर्ता आहे. 'कॉकरोच'च्या स्थापनेनंतर लगोलग त्याला पाठिंबा देण्यासाठी पुढे आलेल्या जर्मनीस्थित ध्रुव राठी याची भारतविरोधी मानसिकता सर्वपरिचित आहे. त्यासह अरब देशातील ज्या मुसलमान युवकाने हे संकेतस्थळ बनवून दिले आहे, तोही आपचा कार्यकर्ता राहिला आहे. ज्या वल्गना करत भ्रष्टाचारविरोधाचे वारू चौफेर उधळत 'आप' जन्मला, त्याच धर्तीवर 'कॉकरोच पक्ष'ही जन्माला घातला गेला आहे, हे उघड आहे. या पक्षात सहभागी होर्णायांत आणि त्याला पाठिंबा देर्णायांत ठराविक वलयांकित व्यक्ती अन् काही राजकीय लोकप्रतिनिधीही आहेत, जे सातत्याने हिंदु आणि देशविरोधी कनाथके पसरवण्यात पुढे असतात. विरोधी पक्षांतील काही जणांनीही या पक्षाला जोर दिला आहे. 'कॉकरोच'च्या रातोरात लोकप्रियतेचे हे गणित आहे. भारतात जेन्-झी चळवळ जन्माला घालण्याची ही काही पहिली वेळ नाही. त्याचप्रमाणे जन्मताच उभी रहाण्याच्या धडपडीत अशा चळवळींची पोलखोल होण्याचीही ही पहिली वेळ नाही. शेजारी देशांत सत्तापालट करू शकणारी ही वावटळे भारतात कितीही वेळा उठली असली, तरी 'ती देशासाठी योग्य नाहीत', हे भारतियांना आम आदमी पक्षाच्या उगमापासून आतापर्यंतच्या वाटचालीवरून उमगले आहे. प्रश्न विचारून, तर्क लावून, अभ्यास करून संतुलितपणे व्यक्त होणाऱ्यांची संख्या भारतात अद्यापही मोठी आहे. त्यामुळे पिढ्यांना नावे देऊन त्यांच्यात दरी निर्माण करण्याचा अलीकडील काही वर्षांतील साम्यवादी प्रकार भारताच्या सांस्कृतिक मुळांना दूर करण्यात सफल झालेला नाही. तरीही 'डीप स्टेट'-साम्यवादी-जिहादी यांची आघाडी भारतातील 'जेन झी'कडे आशाळभूतपणे डोळे लावून बसली आहे. शासकीय यंत्रणांच्या, भ्रष्टाचार्यांच्या कृत्यांमुळे क्षुब्ध असलेल्यांपैकी काही जण नकळतपणे 'कॉकरोच जनता पार्टी'च्या भूलथापांना बळी पडलेले असू शकतात. नवमार्क्सवादात अशांना 'युजफूल इडियट्स' म्हटले असून त्यांचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे 'कॉकरोच जनता पार्टी'सारख्या छुप्या साम्यवादी प्रकारांना भारतियांनी भूलू नये. त्यासाठी पंचतंत्रातील लहानशा बोधप्रद गोष्टी पुन्हा समजून घ्याव्यात. सत्य न मानणाऱ्या मूर्ख घुबडांच्या नादी लागून खोट्याला सत्य मानू नये आणि धूर्त लोकांच्या संगतीत स्वतःच्या अस्तित्वाचा त्याग करण्याच्या भानगडीत पडू नये, हा या 'झुरळ' कथेचा बोध आहे. भारत आणि भारतीय ऊर्जासंकटाच्या काळात ते टाळण्यासाठी अन् त्याची तीव्रता न्यून करण्यासाठी प्रयत्नरत आहेत. अशा वेळी भारतीय समाजाला योग्य दिशेने घेऊन जाणाऱ्यांची आवश्यकता आहे. भारताला नागरिकांचा संघटितपणा, देशप्रेम यांची आवश्यकता असतांना नको त्या चळवळी जन्माला घालून भारतीय युवकांची ऊर्जा भरकटवणाऱ्या अशा चळवळींना कोणतेही भविष्य नाही. देश ऊर्जासंकटाच्या उंबरठ्यावर असतांना देशात चालू होणाऱ्या कोणत्याही चळवळींना योग्य दिशा आवश्यक आहे. सामाजिक माध्यमांच्या वेगवान युगात भावना भडकवणे, कृत्रिम लोकप्रियता निर्माण करणे आणि काही कथित युवकांच्या असंतोषाला राजकीय दिशा देणे, हे देशविरोधी शक्तींसाठी सोपे झाले आहे. त्यामुळे प्रत्येक भारतियाने कोणत्याही नव्या चळवळीचा स्वीकार करण्यापूर्वी तिच्या मागील विचारसरणी, निधी, उद्देश आणि लाभार्थी यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारताला आज भावनिक उत्तेजनातून आलेला क्षणिक आक्रोश नव्हे, तर राष्ट्रनिष्ठ, संयमी आणि विधायक युवकशक्तीची आवश्यकता आहे.

लोकांचा व्यवस्थेविरोधातील डिजिटल उद्रेक!

भारताची सामाजिक परिस्थिती सध्या आव्हानात्मक आहे. सामान्य माणसांसमोर आव्हानांचा डोंगर उभा आहे. त्यातल्या त्यात तरुणांचे प्रश्न गंभीर आहेत. वाढती तरुणांची संख्या हे देखील देशासमोरचं आव्हान आहे. होय! आव्हानच. देशात तरुणांची संख्या अधिक असेल तर तो देश तरुण असल्याचे मानले जाते. पण त्याच तरुणांच्या हाताला काम नसेल तर ते एक देशासमोरचे आव्हान बनते. भारतात सध्या तशीच परिस्थिती आहे. तरुणांच्या बेरोजगारीचा प्रश्न अनेक सरकारांना सोडवता आलेला नाही. पण हाच मुद्दा विरोधी पक्षांसाठी आजपर्यंत अस्त्र ठरला आहे. सरकारं बदलली तरी दशकानुदशके परिस्थिती सारखीच आहे. बदल इतकाच झाला की बदलत्या काळाप्रमाणे आंदोलनांचे स्वरूप बदलत गेले. आणि आता हेच आंदोलन डिजिटल पातळीवर आले आहे.

भारतामध्ये सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून 'कॉक्रोच जनता पार्टी' अर्थात उखढ नावाची एक वेगळीच चळवळ चर्चेत आली आहे. सुरुवातीला अनेकांना हे एखादं मीम पेज किंवा विनोदी राजकीय ट्रोलिंग वाटलं. पण हळूहळू या चळवळीमागील राग, असंतोष आणि तरुणांच्या भावना समोर येऊ लागल्या आहेत. बेरोजगारी, न्यायव्यवस्थेवरील प्रश्न आणि राजकीय व्यवस्थेबद्दलचा अविश्वास या सगळ्यांच्या मिश्रणातून कॉक्रोच जनता पार्टी नावाने एक आंदोलन उभं राहिलं आहे.

या संपूर्ण वादाची सुरुवात भारताच्या सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान झालेल्या कथित वक्तव्यापासून झाली. सोशल मीडियावर असा दावा करण्यात आला की, मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांची तुलना कॉक्रोच म्हणजेच झुरळ आणि समाजावरचे परजीवी अशी केली. हे वक्तव्य व्हायरल झाल्यानंतर अनेक तरुण संतप्त झाले. विशेषतः जेन झी पिढीने या प्रकरणाला फक्त न्यायालयीन टिप्पणी म्हणून न पाहता, बेरोजगार तरुणांचा हा अपमान असल्याचं मानून घेतलं.

यानंतर सोशल मीडियावर अचानक 'कॉक्रोच जनता पार्टी' हे नाव ट्रेंड होऊ लागलं. या चळवळीची सुरुवात अभिजीत दीपके नावाच्या व्यक्तीने केली. अभिजीत दीपके हे पूर्वी आम आदमी पक्षाशी संबंधित सोशल मीडिया मोहिमांमध्ये काम करत होते. त्यांनीच सोशल मीडियावर या अनोख्या मोहिमेला सुरुवात केली. सुरुवातीला ही फक्त व्यंगात्मक मोहीम होती, पण काही तासांतच हजारो तरुणांनी या मोहिमेला पाठिंबा द्यायला सुरुवात केली.

कॉक्रोच जनता पाटीर्ची सर्वात मोठी ताकद म्हणजे तिची डिजिटल भाषा. पारंपरिक राजकारणाप्रमाणे मोठमोठ्या सभा, पोस्टरबाजी किंवा रस्त्यावरचे आंदोलन न करता, या गटाने मीम्स, सटायर, इन्स्टाग्राम रील्स आणि व्हायरल पोस्टच्या माध्यमातून आपला संदेश पसरवला. अनेक तरुणांनी स्वतःला कॉक्रोच म्हणत सरकार, न्यायव्यवस्था आणि राजकीय पक्षांवर टीका सुरू केली. काहींनी तर बेरोजगार असणं गुन्हा असेल, तर आम्ही कॉक्रोच आहोत, अशा ओळी वापरून सोशल मीडियावर मोहीम राबवली.

या चळवळीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचा व्यंगात्मक जाहीरनामा. सोशल मीडियावर फिरर्णाया पोस्टनुसार, या पक्षाने अनेक विनोदी पण वास्तवाला स्पर्श करर्णाया मागण्या केल्या. उदाहरणार्थ, निवृत्त न्यायाधीशांना राजकारणात प्रवेशबंदी, बेरोजगारीवर राष्ट्रीय चर्चा, विद्यार्थ्यांवरील दडपशाही थांबवणे, आणि राजकीय पक्षांमध्ये पारदर्शकता आणणे अशा मुद्द्यांचा उल्लेख करण्यात आला. हे सर्व मुद्दे विनोदाच्या माध्यमातून मांडले गेले असले, तरी त्यामागे एक सामाजिक राग आहे.

सुरूवातीला ही मोहीम जेन झीपर्यंत मर्यादित राहील असे वाटले होते, पण काही दिवसातच या चळवळीला हजारो लोकांनी ऑनलाईन समर्थन दिले. अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि काही विरोधी पक्षातील नेत्यांनीही या विषयावर प्रतिक्रिया दिली. काहींनी याला लोकशाहीतील नव्या प्रकारचा निषेध म्हटलं, तर काहींनी हे न्यायव्यवस्थेचा अपमान असल्याचं सांगितलं. सोशल मीडियावर मात्र या चळवळीचा वेग प्रचंड वाढताना दिसत आहे. विशेषतः बेरोजगारी, परीक्षा घोटाळे आणि तरुणांच्या भविष्याबद्दल चिंता असलेल्या विद्यार्थ्यांनी या मोहिमेशी स्वतःला जोडून घेतलं आहे.

भारतात याआधीही अनेक आंदोलनांनी सोशल मीडियातून मोठं रूप घेतलं आहे. CAA आंदोलन, खठव वाद, विद्यार्थी आंदोलने किंवा शेतकरी आंदोलन यामध्ये डिजिटल प्लॅटफॉर्मची भूमिका महत्त्वाची होती. पण कॉक्रोच जनता पाटीर्च स्वरूप थोडं वेगळं आहे. इथे आंदोलन आणि मनोरंजन यांची सीमारेषाच धूसर झालेली दिसते. मीम संस्कृती आणि राजकीय विरोध एकत्र मिसळल्यामुळे ही चळवळ तरुणांना अधिक जवळची वाटत आहे.

या प्रकरणामुळे आणखी एक मोठा प्रश्न समोर आला आहे. भारतातील तरुणांचा वाढता असंतोष. शिक्षण पूर्ण करूनही नोकरी न मिळणं, स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, वाढती महागाई आणि राजकीय भाषणांमधील कटू भाषा यामुळे अनेक तरुण नाराज आहेत. कॉक्रोच जनता पार्टी ही अजून काही अधिकृत राजकीय पार्टी नसली, तरी ती लोकांच्या सरकारविषयीच्या नाराजीचं प्रतीक बनत चालली आहे.



भारतामध्ये सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून ह्यकॉक्रोच जनता पार्टीह्ण अर्थात उखढ नावाची एक वेगळीच चळवळ चर्चेत आली आहे. सुरुवातीला अनेकांना हे एखादं मीम पेज किंवा विनोदी राजकीय ट्रोलिंग वाटलं. पण हळूहळू या चळवळीमागील राग, असंतोष आणि तरुणांच्या भावना समोर येऊ लागल्या आहेत. बेरोजगारी, न्यायव्यवस्थेवरील प्रश्न आणि राजकीय व्यवस्थेबद्दलचा अविश्वास या सगळ्यांच्या मिश्रणातून कॉक्रोच जनता पार्टी नावाने एक आंदोलन उभं राहिलं आहे.

विशेष म्हणजे या चळवळीने पारंपरिक राजकारण्यांनाही अस्वस्थ केलं आहे. कारण ही चळवळ कोणत्याही एका विचारसरणीपुरती मर्यादित नाही. यात डाव्या विचारांचे लोक आहेत, सरकारविरोधी लोक आहेत, पण त्याचबरोबर फक्त बेरोजगारी आणि व्यवस्थेवर नाराज असलेले सामान्य तरुणही आहेत. त्यामुळे कॉक्रोच जनता पार्टी ही फक्त विनोद नाही, तर व्यवस्थेविरोधातील डिजिटल प्रतिकाराचं नवं मॉडेल असल्याचं अनेक विश्लेषक मानत आहेत. जगात याआधी देखील अशा प्रकारची आंदोलनं झाली आहेत. स्वरूप अगदी सारखे नव्हते, पण त्याचा आधार सोशल मीडिया होता. अमेरिकेत 2011 मध्ये Occupy Wall Street आंदोलन सुरू झालं. सुरुवातीला हे काही कार्यकर्त्यांचं छोटं आंदोलन होतं, पण सोशल मीडिया, पोस्टर्स आणि सटायरच्या माध्यमातून ते जगभर चर्चेत आलं. 1% श्रीमंत लोक संपूर्ण व्यवस्था नियंत्रित करत आहेत, हा या आंदोलनामागचा मुख्य मुद्दा होता. त्यावेळी ही are the 99% हे घोषवाक्य इंटरनेटवर प्रचंड व्हायरल झाले होते. लोकांनी मीम्स, फोटो आणि वैयक्तिक कथा शेअर करून आर्थिक विषमता आणि बेरोजगारीविरोधात आवाज उठवला. हे आंदोलन नंतर अनेक देशांत पसरलं.

फ्रान्समध्ये 2018 मध्ये इंधन दरवाढीविरोधात Yellow Vest आंदोलन सुरू झालं. सुरुवातीला फेसबुक पोस्ट आणि सोशल मीडिया गटांमधून ही मोहीम तयार झाली. आंदोलनकर्त्यांनी पिवळे रिफ्लेक्टिव्ह जॅकेट घालून सरकारविरोधात निदर्शने केली. मीम्स, सटायर पोस्ट आणि वायरल व्हिडिओंमुळे हे आंदोलन देशभर पसरलं. नंतर ते फक्त इंधन दरवाढीपुरतं मर्यादित न राहता बेरोजगारी, महागाई आणि सरकारविरोधी जनआंदोलन बनलं.

थायलंड, म्यानमार, हाँगकाँग आणि तैवानमध्येही अशी आंदोलनं झाली होती. त्यावेळी तरुणांनी सोशल मीडियावर Milk Tea Alliance नावाची डिजिटल चळवळ सुरू केली. सुरुवातीला हे फक्त इंटरनेटवरील मजेदार सांस्कृतिक मीम होते, कारण या देशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे मिल्क टी लोकप्रिय आहेत. पण नंतर हे लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि चीनच्या प्रभावाविरोधातील मोठं डिजिटल आंदोलन बनलं. ट्विटर आणि इन्स्टाग्रामवर लाखो पोस्ट्स या मोहिमेशी जोडल्या गेल्या.

सध्या भारतात सुरू झालेली कॉक्रोच जनता पार्टी ही चळवळ मुख्यतः सोशल मीडियापुरती मर्यादित आहे. पण तिची लोकप्रियता पाहता, भविष्यात ती अधिक संघटित रूप घेईल का? हा प्रश्न अनेकांना पडला आहे. काही लोक याकडे फक्त काही दिवसांचा इंटरनेट ट्रेंड म्हणून पाहत आहेत, तर काहींच्या मते ही भारतातील डिजिटल राजकारणाची नवी सुरुवात ठरू शकते. सध्या कॉक्रोच जनता पाटीर्च अधिकृत एक्स अकाऊंट भारतात स्थगित करण्यात आलं आहे. म्हणजे भारतातून ते अकाऊंट दिसत नाही. काही रिपोर्ट्सनुसार ही कारवाई कायदेशीर मागणीनंतर झाली आहे. अभिजीत दीपके यांनी पुन्हा नव्याने एक्स अकाऊंट सुरू केले आहे. इन्स्टाग्रामवरही अकाऊंटला हॅक करण्याचा प्रयत्न झाला. संस्थापक अभिजीत दीपके यांनी स्वतः ही माहिती पोस्ट करून दिली.

या आंदोलनातून एक बाब लक्षात येते ती म्हणजे आजचा भारतीय तरुण पारंपरिक भाषणांनी समाधानी नाही. तो प्रश्न विचारतो, व्यंग करतो, मीम बनवतो आणि सोशल मीडियावरून स्वतःचा विरोध नोंदवतो. कॉक्रोच जनता पार्टी ही त्याच नव्या डिजिटल पिढीची भाषा बनली आहे. याचा परिणाम जमिनीवर लगेच दिसून येणारा नसला तरी भविष्यात होर्णाया निवडणुकांमध्ये विरोधकांसाठी ही मोहीम एक आयते अस्त्र ठरू शकते.

'झुरळां'ची आभासी एकजूट

समाजमाध्यमांवर सक्रिय राहून व्यवस्थेवर टीकाटिप्पणी करणाऱ्या बेरोजगार तरुणांचा, सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी 'झुरळ' असा उल्लेख केल्यानंतर या झुरळांच्याच नावाने पक्ष स्थापन करून चार दिवसांतच देशातील सर्वाधिक ऑनलाइन पाठीराखे मिळविण्याची घटना आपल्याकडील युवकांतील अस्वस्थता अधोरेखित करणारी आहे, यात शंका नाही.

ऑनलाइन जगतात 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) झेंड्याखाली अल्पावधीत सुमारे दोन कोटी लोकांचे एकवटणे ही आजच्या माहिती तंत्रज्ञानावरील अवलंबित्व वाढलेल्या काळातील एक महत्त्वाची घटना. समाजात प्रस्थापितांच्या विरोधात राग असतो; तो व्यक्त करण्यासाठी समाजमाध्यमे उपलब्ध असली, तरी त्याची तीव्रता वाढण्यासाठी आणि तो सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी चळवळीचीही गरज असते. झुरळांच्या नावाने सुरू झालेला पक्ष अशी चळवळ उभा करू शकतो काय, हे पाहावे लागेल.

तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेते विजय यांच्या पक्षाने समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला हे खरे; परंतु त्याच्या जोडीने रस्त्यावर उतरून आखणीही केली. रोजगार, महागाई यांसारख्या प्रश्नांना भिडणाऱ्यांच्या आणि रोज उपेक्षेला सामोरे जाणाऱ्यांच्या मनात असलेल्या तीव्र संतापाचे परिवर्तनात रूपांतर करण्यासाठी पक्ष स्थापून आणि त्याला कोट्यवधी ऑनलाइन पाठीराखे मिळवून 'सीजेपी'ने जोरकस पाऊल उचलले. आता याच पाठीराख्यांच्या मदतीने जमिनीवरून काम करावे लागेल आणि त्याचे आव्हान मोठे आहे.

आजच्या काळात 'नॅरेटिव्ह' म्हणजेच कथनाला विशेष महत्त्व आहे. समाजमाध्यमाद्वारे आपले कथन जोरकसपणे मन-मेंदूपर्यंत पोहोचविता येते. राजकारणाचा हा ऑनलाइन ते ऑफलाइन प्रवास नवा नाही. 'सीजेपी'ला तो आता करावा लागेल. मूळच्या छत्रपती संभाजीनगरातील आणि सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या अभिजीत दीपके या युवकाने, सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर आपले 'कथन' मांडले.

'बेरोजगार, आळशी, ऑनलाइन पडीक आणि सराईतपणे रडगाणे गाणारे' या सर्वांना त्याने आवाहन केले. त्यात उपहास असला, तरी तो विदारक होता. त्याच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला.

आपल्याला एखाद्या यःकश्चित झुरळासमान मानावे याचा रागही या प्रतिसादात आहे. बेरोजगार तरुणांमधील खदखद किती खोलवर आहे, हे यातून दिसते. मोठ्या घटनांनंतर त्यांची खिल्ली उडविणारे 'मीम्स' समाजमाध्यमांवर येत असतात; नवा विषय आला, की आधीचा विषय मागे पडतो. झुरळाच्या नावे पक्षस्थापनेची घटना, तिला मिळालेला प्रतिसाद आणि दीपके यांची विधाने पाहता हा विषय मागे पडणारा नाही; तसेच तो बेदखल करण्याजोगाही नाही.

मात्र, समाजमाध्यमांवरील पाठीराख्यांची संख्या हा निकष असू शकतो काय? याचे उत्तर हे कथित पाठीराखे कुणाचे यावर बेतलेले असते. स्वतःला 'झुरळ' म्हणवून घेत पुढाकार घेणारा दीपके सध्या तरी भारतात राहत नाही. सारी सूत्रे तो अमेरिकेत राहून हलवितो आहे. या पक्षाबाबत तो किती गंभीर आहे, हे त्याच्या पुढील कृतींवरून कळेल. 'सीजेपी'च्या पाठीराख्यांत असे परदेशांतील अनेक जण असू शकतात; काही बनावटही असू शकतात. मात्र, त्यांच्या वाढत्या संख्येची येथील प्रस्थापितांना दखल घ्यावी लागली. अनेक तक्रारीअंती 'सीजेपी'चे 'एक्स' खाते स्थगित करण्यात आले. ते हॅक करण्याचेही प्रयत्न झाले. दीपकेला जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या.

'सीजेपी'चे पाठीराखे खोटे असल्याचे किंवा त्यामागे अन्य कोणाचे कारस्थान असल्याचे दावे केले गेले. देशभक्तीच्या औषधाने अशी 'झुरळे' मारण्याची भाषाही केली गेली. सत्ताधारी भाजपने अधिकृत प्रतिक्रियाही दिली. 'झुरळां'च्या एकजुटीकडे पाहिले जात आहे, हाच याचा अर्थ. 'सीजेपी'च्या निमित्ताने तरुणाईला मते मांडण्यासाठी, आपल्या कल्पनेतील आदर्श व्यवस्था सांगण्यासाठी आणि देश घडविण्यासाठी एक पक्ष मिळाला आहे. लोकशाहीमध्ये तरुणांना आकर्षित करणारे असे पक्ष उदयाला येऊन व्यवस्थेचा भागही बनतात. राज्यघटनेच्या चौकटीत राहून, अराजकतेला आमंत्रण न देता सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षाच्या रूपाने पुढे येणाऱ्या सर्वांचेच स्वागत करायला हवे. झुरळांच्या नावे सुरू झालेला पक्षही याला अपवाद नाही.

बंगालची सत्यान्वेषी वाटचाल!

बंगालमध्ये मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आल्यापासून नव्या निर्णयांचा धडाकाच लागला आहे. प्रतिदिन एक नवीन निर्णय! मुख्यमंत्र्यांनी राज्यातील महिला आणि मुले यांच्यावरील हिंसाचार रोखण्यासाठी एक शक्तीशाली समिती नेमली असून त्यात 'सदस्य सचिव' या महत्त्वाच्या पदावर ज्या महिला पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे, त्यांची पार्श्वभूमी तितकीच महत्त्वपूर्ण आहे. या महिला पोलीस अधिकारी म्हणजेच दमयंती सेन! वर्ष २०१२ मध्ये गाजलेल्या पार्क स्ट्रीट सामूहिक बलात्कार प्रकरणाच्या अन्वेषणात त्यांनी हिरीरीने पुढाकार घेऊन पुराव्यांद्वारे सत्य समोर आणण्यासाठी पुष्कळ कष्ट घेतले; पण ममता बॅनर्जी यांनी 'सरकारची प्रतिमा मलिन करण्यासाठी रचलेली खोटी गोष्ट' म्हणून हे प्रकरण उघडपणे फेटाळले. केवळ काही दिवसांत गुन्हेगारांना ओळखून 'सामूहिक बलात्काराची घटना ही खोटी गोष्ट नसून ते कठोर आणि भयानक वास्तव आहे', हे सिद्ध करणारे पुरावेही सेन यांनी न्यायालयासमोर सादर केले; पण तत्कालीन तृणमूल काँग्रेस सरकारला सत्य कुठे पचत होते? ममता बॅनर्जी यांनी दमयंती सेन यांना कोलकाता पोलीस मुख्यालयातून हटवून बॅरकपूर आयुक्तालयातील दुय्यम पदावर त्यांचे स्थानांतर केले, तसेच त्यानंतर त्यांच्याकडे कोणत्याही मोठ्या प्रकरणाचे अन्वेषण दिले नाही. ममताबानो यांनी त्यांच्यावर एकप्रकारे सूडच उगवला. एका कर्तव्यदक्ष महिला पोलिसावर सरकारने केलेला हा अन्यायच होता. धावत्या गाडीत महिलेवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणाचे वास्तव पुराव्यानिशी उघड करर्णाया या महिला पोलीस अधिकर्णायाचा खरेतर गुणगौरव व्हायला हवा होता, त्यांना पुरस्काराने सन्मानित करायला हवे होते, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्यासाठी त्यांना आणखी उच्च पद मिळणे अपेक्षित होते; पण पदरी पडली उपेक्षाच! त्यांचा उत्साह, जिद्द, प्रेरणा दाबून टाकण्याचा ममताबानो सरकारचा हा जनताद्रोही प्रयत्न होता. अशा निर्णयातून ममता बॅनर्जी यांनी पोलिसांवर अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केला. 'सद्वर्तन', 'संरक्षण', 'सुव्यवस्था' यांसाठी पोलिसांनी प्रयत्नच करू नयेत, हा तत्कालीन सरकारचा डाव होता. पोलिसांनी कुणावरही वचक ठेवायचा नाही आणि पोलिसांच्या मानगुटीवर मात्र तत्कालीन सरकारचा वचक! असे गुंडाराज बंगालमध्ये चालू होते. दमयंती सेन प्रकरणामुळे कित्येक प्रामाणिक पोलिसांना निराशा आली आणि पोलीसदलही हतबल झाले. सत्य किंवा न्याय यांच्या बाजूने उभे राहून अन्यायाला विरोध करर्णाया पोलिसांवरच अन्याय होणे हे दुर्दैवी आणि संतापजनकही आहे. अर्थात अशा अन्यायकारक काळ्या कृत्यांची शिक्षा तृणमूल काँग्रेस सरकारला आता भोगावी लागत आहे, हे संपूर्ण देशही पहात आहे. सत्य कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते अधिक काळ झाकोळून ठेवता येत नाही. कधी ना कधी ते उघड होतेच. सत्य कधीही पराभूत होत नसते. याप्रमाणे इतकी वर्षे झाकोळल्या गेलेल्या दमयंती सेन यांचे तडफदार व्यक्तीमत्त्व १४ वर्षांनंतर पुन्हा एकदा जनतेला पहायला मिळणार आहे. त्यांचे हे पुनरागमन मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांच्यामुळेच साध्य झाले. १४ वर्षे उपेक्षित राहिलेल्या दमयंती सेन यांना त्यांनी मुख्य प्रवाहात आणून पुन्हा एकदा न्यायाचे दालन उघड केले. महिला आणि मुले यांच्यावरील अत्याचार दूर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी नेमलेली समिती १ जूनपासून कामाला आरंभ करील. दमयंती सेन यांनी युद्धपातळीवर संबंधित माहिती आणि पुरावे गोळा करण्यास आधीच प्रारंभ केला आहे. 'नव्या सरकारच्या कार्यकाळात सत्याला पाठिंबा देणाऱ्या अधिकाऱ्यांना आदर आणि सन्मान दिला जाईल', हा उघड संदेश मुख्यमंत्र्यांनी यातून दिला आहे. दमयंती सेन यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी संपूर्ण देशवासियांच्या शुभेच्छा!



नीतीवानांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न!

प्रामाणिक अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि त्यांना खोट्या आरोपांखाली त्रास देणे, हे प्रकार अनेकदा काही सत्ताधाऱ्यांकडून केले जातात. अशोक खेमका या हरियाणातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे ४० हून अधिक वेळा स्थानांतर करण्यात आले. आरोप काय, तर त्यांनी भूमी व्यवहारातील गैरप्रकार उघड केले होते. उत्तरप्रदेश येथील दुर्गा शक्ती नागपाल यांनी अवैध वाळू माफियांच्या विरोधात कारवाई केल्याप्रकरणी त्यांचे अचानक निलंबन करण्यात आले. सत्येंद्र दुबे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पातील भ्रष्टाचार उघड केल्याने त्यांची हत्या करण्यात आली. या सर्व घटनांमधून काय लक्षात येते, तर लढा देणाऱ्यांनाच संपवण्याचा प्रयत्न केला जातो. खरेतर सरकारचे बटीक होण्यापेक्षा सत्य आणि प्रामाणिकता यांच्या बळावर कार्य करणारे नीतीवान अधिकारी आज देशाला हवे आहेत; पण दुर्दैवाने त्यांना सरकारचे नोकर व्हावे लागते. तत्कालीन ममता बॅनर्

उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

साहित्य : कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

पाककृती : वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

कसा बनवाल

▮कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.

▮rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

कसा कराल हा पॅक

▮एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.

▮यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.

▮तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.

▮अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

कसा बनवाल मास्क

▮एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.

▮त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.

▮या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.

▮त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.


▮हा उपाय नियमित करा.



केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

उन्हाळ्याची काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.

उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. ॲंटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो. उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.



ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

सकाळी उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवानाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये ॲंटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

स्मार्ट लॉकसह अनलॉक करा : हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

ऑन-बॉडी डिटेक्शन : येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले



जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वसनीय ठिकाणे : तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

विश्वसनीय उपकरणे : विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वासार्ह चेहरा : फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

व्हॉइस मॅच : तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

बिटाच्या अतिसेवनाने होऊ शकतात दुष्परिणाम

बीट ही भाजी शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगली समजली जाते. पण आरोग्याच्या दृष्टीने एखादा पदार्थ कितीही चांगला असला, तरी त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम उद्भवू शकतात. बिटाच्या अतिसेवनाने देखील शरीरावर काही दुष्परिणाम दिसून येण्याची शक्यता असते. हे दुष्परिणाम कोणते आहेत, ते जाणून घेऊ या. बिटाच्या अतिसेवनाने 'गाऊट' किंवा किडनी स्टोन्स सारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. तसेच बिटाच्या रसाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये लोह, कॉपर, मॅग्नेशियम, लिव्हरमध्ये साठत राहून त्यामुळेही समस्या उद्भवू शकतात.

बिटाच्या अतिसेवनामुळे 'बीट-युरिया' दिसून येण्याची शक्यता असते. लघवीचा सामान्य रंग बदलून तो बिटाप्रमाणे लालसर होणे हे बीट-युरियाचे लक्षण आहे. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, त्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक उद्भवते. ही समस्या फारशी गंभीर नसली, तरी यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बिटामध्ये 'ऑक्सलेट' मुबलक मात्रेमध्ये असून यांच्या अतिसेवनाने किडनी स्टोन्स होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये आधीपासूनच किडनी स्टोन्सची समस्या असते, त्यांना बीट आहारातून कमी करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच ज्यांना 'गाऊट' हा विकार असेल, त्यांनाही बीट आहारातून वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो.



बिटाच्या अतिसेवनाचे आणखी एक लक्षण म्हणजे शरीरावर येणारे बारीक पुरळ. हे लक्षण सामान्य नसून, अतिशय अभावानेच आढळते. बिटाच्या अतिसेवनाने अंगावर बारीक पुरळ उठणे, शरीरावर लालसर चट्टे उठणे, खाज सुटणे, आणि क्वचित थंडी वाजून ताप येणे अशी लक्षणेही पाहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे बिटाचे सेवन केल्यानंतर आवाज बसण्याची समस्या दुर्मिळ असली, तरी पाहिली गेली आहे. बिटाच्या अतिसेवनाने पोटामध्ये गॅसेस होऊन पोटदुखी उद्भवू शकते. तसेच पोट फुगणे, बद्धकोष्ठ याही समस्या बिटाच्या अतिसेवनाने उद्भवू शकतात.

उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या '५' टीप्स



उन्हाळ्याच्या दिवसांत घामामुळे डोक्याला खाज येणं, केसात कोंडा वाढणं हा त्रास हमखास आढळतो. उन्हाळ्यात त्वचेची, आरोग्याची काळजी घेतली जाते. पण केसांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. परिणामी अनेक छुपे त्रास किंवा त्वचा विकार वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच शुष्क आणि फ्रिझी केसांची नेमकी काळजी कशी घ्यावी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.

उन्हाळ्याच्या दिवसात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता यामध्ये बदल होत असल्याने केस अधिक शुष्क होतात. उन्हाळ्याच्या दिवसात घाम येण्याचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे टाळूजवळील त्वचा अधिक चिकट होते. त्याचा परिणाम केसांवरही जाणवतो.

▮उन्हाळ्याच्या दिवसात किमान २-३ वेळा केस स्वच्छ धुवावेत. नियमित केस धुणे शक्य नसेल तर एक आड एक दिवस केस स्वच्छ धुवावेत. यामुळे केस चिकट होणार नाहीत.

▮केस धुण्यासाठी माईल्ड किंवा हर्बल शाम्पू वापरा. केमिकलयुक्त शाम्पूमुळे केसांचे अधिक नुकसान होते. तुम्हांला डॅण्डरफचा त्रास असेल तर ॲण्टी डॅण्डरफ शाम्पू वापरा.

▮शाम्पूने केस धुतल्यानंतर चांगल्या दर्जाचे कंडिशनरही वापरा. टाळूवर कंडिशनर लावू नका. शक्य असेल तर लिव इन कंडिशनर वापरा. यामुळे सूर्याच्या प्रखर किरणांप्रमाणेच प्रदूषणामुळे केसांचे होणारे नुकसान टाळण्यासही मदत होते.

▮उन्हाळ्याच्या दिवसात केसांची चमक आणि पोत सुधारण्यासाठी ॲप्पल सायडर व्हिनेगर फायदेशीर ठरते. या घरगुती उपायासाठी दोन टीस्पून ॲप्पल सायडर व्हिनेगर एक लिटर पाण्यामध्ये मिसळा. केस शाम्पूने धुतल्यानंतर केस या पाण्यानेही स्वच्छ धुवा.

▮तुमचे केस मोकळे सोडणार असाल तर सनस्क्रीनयुक्त हेअर कंडिशनर आणि सेरम वापरा. यामुळे घामाने केस चिकचिकीत होण्याची शक्यता कमी होते. यामुळे केस रफ आणि विस्कटलेले दिसण्याची शक्यता कमी होते.



बद्धकोष्ठ दूर करण्याकरिता प्या मूग आणि पालकाचे सूप



आपल्या भोजनाच्या सवयी, आपला आहार आणि आपल्या शरीराला दिवसभरामध्ये होत असणारा व्यायाम, हालचाल, या गोष्टींवर आपण खात असलेल्या अन्नाचे पचन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. जर पचनक्रिया सुरळीत नसेल, तर अपचन, बद्धकोष्ठासारख्या समस्या उद्भवतात. जर तुम्हालाही या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असेल, तर आहारामध्ये थोडा फार बदल करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यास हरकत नाही. जर बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल, तर आपल्या आहारामध्ये मुख्यत्वे फायबरची मात्रा जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याच अंतर्गत आणि सध्याच्या थंडीच्या मोसमामध्ये सर्वांना नक्कीच आवडेल अश्या मूग आणि पालक सूपचा समावेश आहारामध्ये करता येईल.



हे सूप पचण्यास कठीण नसून, यामध्ये शरीरासाठी आवश्यक सर्व पोषक तत्वे आहेतच, त्याच्याच जोडीने पचनासाठी आवश्यक फायबरही या सूपद्वारे शरीराला मिळू शकते. हे सूप बनवण्यासाठी एक कप हिरवे मूग पाण्यामध्ये रात्रभर भिजत घालून ठेवावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी मूग पाण्यातून उपसून स्वच्छ धुवून घ्यावेत आणि प्रेशर कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावेत. एका भांड्यामध्ये थोडेसे तेल किंव साजूक तूप घालून त्यामध्ये एक चिरलेला कांदा, पालकाची पाने (दीड कप), थोडे आले, लसूणाच्या पाच सहा पाकळ्या, हळद आणि पाव चमचा कुटून घेतलेले धणे घालावेत. त्यानंतर यामध्ये आवडत असल्यास गाजराचे तुकडे, फ्लॉवरचे तुकडे, आणि थोडासा पुदिना घालून चांगले परतावे. भाज्या चांगल्या शिजल्या की शिजवून घेतलेले मूग यामध्ये घालून चांगले परतावेत. त्यानंतर गॅस बंद करून हे मिश्रण थंड होऊ द्यावे. मिश्रण थंड झाल्यानंतर थोडेसे पाणी घालून हे मिश्रण मिक्सरवर बारीक वाटून घ्यावे व चाळणीतून किंवा मोठ्या गाळणीतून गाळून घेऊन भाज्यांचा चोथा वेगळा करावा. गाळून घेतलेल्या मिश्रणामध्ये आवश्यक तेवढे पाणी घालून चवीपुरते मीठ आणि काळ्या मिऱ्याची पूड घालावी. सूपला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करावा.

मूग आणि पालक यांमध्ये फायबरची मात्र जास्त असून, मूगामध्ये पोटॅशियमदेखील मुबलक प्रमाणात असते. पालकामध्ये ही जीवनसत्वे, फायबर आणि लोह यांची मात्रा मुबलक असते.

व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमधून घामाची दुर्गंधी अशी करा दूर

व्यायाम करीत असताना पुष्कळ घाम येत असतो. अंगावरील कपड्यांमध्ये हा घाम शोषून घेतला जात असतो. अंगावरील कपडे घामाने ओले झाले असता, त्यामध्ये व्यायाम सुरू ठेवणे अडचणीचे होऊ लागते. ही अडचण दूर करीत व्यायाम करताना घाम शोषून घेण्यासाठी आणि चटकन वाळण्यासाठी आजकाल 'ड्राय फिट' पद्धतीचे कपडे खास व्यायामप्रेमी मंडळींसाठी तयार करण्यात येत असतात. व्यायाम करताना वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे शरीरावरील घाम जरी शोषून घेतला जात असला, तरी अनेकदा या कपड्यांमधील घामाची दुर्गंधी मात्र कपडे धुतल्यानंतरही हटत नाही. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी काही उपायांचा अवलंब करता येऊ शकेल.

आजकाल व्यायामासाठी खास बनवण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये अतिशय सूक्ष्म छिद्रे असतात. पण शरीरावरील घाम, बाहेरील वातावरणातील प्रदूषण, किंवा धुळीचे कण, त्वचेचा तेलकटपणा, कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट इत्यादी कपड्यातून व्यवस्थित साफ न झाल्याने याचे कण या सूक्ष्म छिद्रांमध्ये अडकून राहतात आणि त्यामुळे कपडा धुतल्यानंतर त्यातून विशिष्ट दुर्गंधी येत राहते. ही दुर्गंधी हटवण्यासाठी सर्वप्रथम व्यायाम करून झाल्यानंतर जर कपडे घामाने थोडेच ओले झाले असतील, तर हे कपडे आधी हवेवर चांगले वाळू द्यावेत. कपडे धुण्यासाठी अधिक साबण वापरला तर कपडे अधिक स्वच्छ होतात हा गैरसमज आहे. वास्तविक प्रत्येक पद्धतीचा कपडा ठरावीक साबणाच्या मात्रेने स्वच्छ होणारा असतो. तसेच कपडे मशीनमध्ये धुण्यासाठी वॉशिंग देखील ठरावीक प्रमाणातच साबण वापरला जाणे आवश्यक असते. त्यामुळे यापेक्षा अधिक साबण वापरला गेल्यास कपडे खळबळून धुवूनही हा साबण त्यातून पूर्णपणे निघत नाही. कपड्यातील साबण पूर्णपणे काढून न टाकताच कपडा वाळवला गेला तर यामुळेही कपड्यामध्ये दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे साबणाचा आवश्यक तितकाच वापर केला जाणे आवश्यक आहे.



व्यायामाचे कपडे धुण्यासाठी 'फॅब्रिक सॉफनर'चा वापर करू नये. कपडे साबणाने धुतल्यानंतर ते न आकसता मुलायम आणि सुगंधी राहावेत याकरिता फॅब्रिक सॉफनरचा वापर करण्यात येतो. पण याचा वापर व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांसाठी केला असता, यामुळे कपड्यावरील सूक्ष्म छिद्रे बुजण्याची शक्यता असते. जर ही छिद्रे बुजली, तर कपडा स्वच्छ होत नाही आणि त्यातून दुर्गंधी येऊ लागते. त्याचप्रमाणे सॉफनरच्या वापराने कपड्याचा आकार आणि फिट बिघडण्याची देखील शक्यता असते. जर व्यायामाचे कपडे घामाने भिजून खूपच ओले झाले असतील तर मात्र हे कपडे हवेवर वाळू न देता त्वरित धुणे योग्य ठरते. कपडे धुण्यापूर्वी ते उलटे करावेत, यामुळे तुमच्या त्वचेच्या संपर्कात आलेला कपड्याचा भाग व्यवस्थित धुतला जातो. व्यायामाचे कपडे शक्यतो इतर कपड्यांच्या जोडीने धुणे टाळावे. तसेच हे कपडे धुताना पाण्यामध्ये थोडे व्हिनेगर घालून कपडे धुवावेत. व्हिनेगरमुळे कपड्यांमधील दुर्गंधी पूर्णपणे दूर होते. व्हिनेरगरचा वापर करायचा असल्यास आधी एका बादलीमध्ये चार भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगरमध्ये कपडे भिजवून ठेवावेत आणि मग नेहमीप्रमाणे धुवावेत. कपडे धुतल्यानंतर हवेशीर ठिकाणी वाळवावेत. त्यामुळे कपड्यामधील दुर्गंधी नाहीशी होईल.

निसर्गरम्य, पर्यटनप्रेमी माथेरान झालं १७६ वर्षांचं

सह्याद्रीच्या कुशीतील चिमुकले गाव पर्यटकांचे बनले आवडते

प्लास्टिकमुक्त माथेरानची अपेक्षा

माथेरानमध्ये प्लास्टिक कचरा, अतिक्रमण आणि पर्यावरणीय ताणही वाढू लागला आहे. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेले भविष्यातील माथेरान हे पूर्णपणे स्वच्छ, प्लास्टिकमुक्त, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध पर्यटनस्थळ असावं, अशी प्रत्येक माथेरानकराची अपेक्षा आहे.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सह्याद्रीच्या कुशीत विसावलेलं, हिरवाईनं नटलेलं आणि धुक्याच्या शुभ्र चादरीत हरवून जाणारं माथेरान १७६ वा वाढदिवस साजरा करत आहे. महाराष्ट्राचे एकमेव वाहनमुक्त पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेलं माथेरान हे केवळ डोंगररांगांमधील सुंदर गाव नाही, तर इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि मानवी जिद्दीचं प्रतीक आहे.

इ. स.१८५० मध्ये ठाण्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी ह्यू पॉईंट्झ मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावला आणि त्यानंतर ब्रिटिशांनी येथील थंड हवामान, हिरवाई आणि शांत वातावरण पाहून या ठिकाणाचा हिल स्टेशन म्हणून विकास सुरू केला. ह्यमाथेरानह्ल म्हणजे ह्यमाथ्यावरचं जंगलह्ल असा अर्थ असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८०० मीटर उंचीवर वसलेलं हे ठिकाण आजही निसर्गसंपन्नतेमुळे पर्यटकांना आकर्षित करतं. माथेरानच्या चारही बाजूना दऱ्या, घनदाट जंगल आणि लाल मातीचा प्रदेश आहे. येथे मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. धुक्याचे पडदे, ओढे, झरे आणि विविध जैवविविधतेमुळे माथेरान हे पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील क्षेत्र मानलं जातं. येथील दुर्मिळ वनस्पती, पक्षी आणि प्राण्यांमुळे माथेरान केवळ पर्यटनस्थळ नसून पर्यावरण संवर्धनाचं जिवंत उदाहरण ठरतं. माथेरानची खरी ओळख म्हणजे येथील वाहनबंदी. पूर्वीपासून येथे घोडे आणि हाताने ओढल्या जाणाऱ्या रिक्षा हेच प्रमुख प्रवासाचे साधन होते.

काळ बदलला तसे आधुनिकतेची चाहूल लागली आणि आता ई-रिक्षांचा पर्याय पुढे येत आहे. पर्यावरणाला हानी न पोहोचवता प्रवास अधिक सोयीस्कर करण्याचा प्रयत्न सुरू असला तरी विकास करताना माथेरानची मूळ ओळख जपणं तितकंच आवश्यक आहे.

ब्रिटिश काळात श्रीमंत अधिकारी आणि व्यापाऱ्यांसाठी प्रसिद्ध असलेलं माथेरान आता सर्वसामान्य पर्यटकांचं आवडतं पर्यटनस्थळ बनलं आहे. चार्लोट लेक, पॅनोरमा पॉईंट, इको पॉईंट, लुईसा पॉईंट, वन ट्री हिल यांसारखी ठिकाणं आजही पर्यटकांना भुरळ घालतात. माथेरानची मिनी ट्रेन ही येथील ऐतिहासिक ओळख असून डोंगर-दऱ्यांतून धावणारी ही ट्रेन पर्यटकांसाठी विशेष आकर्षण आहे. पर्यटनामुळे येथील हॉटेल व्यवसाय, घोडेवाले, हातरिक्षाचालक, दुकानदार, फोटोग्राफर आणि छोटे व्यावसायिक यांना रोजगार मिळतो.

माथेरानमध्ये पर्यटन हाच मुख्य व्यवसाय असून अनेक कुटुंबं पिढ्यानपिढ्या पर्यटकांवर आधारित व्यवसाय करत आहेत. येथील लोक साधे, प्रेमळ आणि मेहनती आहेत. पर्यटकांना मदत करणं आणि पाहुणचार करणं ही माथेरानची परंपरा आहे. डोंगराळ भाग असूनही माथेरानमध्ये शिक्षणाची चांगली परंपरा आहे. स्थानिक युवकांना रोजगार, घोडेवाले आणि हातरिक्षाचालकांना सुविधा, उत्तम आरोग्य व शिक्षण व्यवस्था आणि ऐतिहासिक वारसा जपत विकास होणं आवश्यक आहे.

महाराष्ट्रात उभारली जाणार कोरियन 'लर्निंग फॅक्टरी'

कौशल्य विकासासाठी राज्य सरकारचे ३ ऐतिहासिक करार



व्यवसाय शिक्षण संचालनालय आणि कोरिया पॉलिटेक्निक्स यांच्यातील करारांतर्गत महाराष्ट्रात दक्षिण कोरियाच्या धर्तीवर 'लर्निंग फॅक्टरी' मॉडेल राबवले जाणार आहे. यामध्ये उद्योगांच्या गरजेनुसार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मे ते सप्टेंबर २०२६ या काळात या केंद्रांचा संपूर्ण आराखडा आणि धोरण निश्चित केले जाईल. त्यानंतर मार्च २०२७ ते जून २०२८ या कालावधीत ही अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष सुरू होतील.

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि तरुणांना जागतिक स्तरावर रोजगाराच्या उत्तम संधी मिळाव्यात आणि राज्याच्या कौशल्य विकास धोरणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, यासाठी राज्य सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. गुरुवारी सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दक्षिण कोरियातील तीन नामांकित तांत्रिक आणि शैक्षणिक संस्थांसोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे राज्यातील तरुणांना आंतरराष्ट्रीय दजार्चे प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

तीन प्रमुख संस्थांसोबत ऐतिहासिक करार

हे सामंजस्य करार प्रामुख्याने तीन पातळ्यांवर करण्यात आले आहेत. पहिला करार राज्याचे 'व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय' आणि 'कोरिया पॉलिटेक्निक्स' यांच्यात झाला. दुसरा करार 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी' आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर लाइफलाँग एज्युकेशन' यांच्यात, तर तिसरा महत्त्वाचा करार नव्याने स्थापन झालेले 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ' आणि 'कोरिया ॲडव्हान्स्ड इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी' यांच्या दोन स्कूल्ससोबत पार पडला.

१ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष आणि तरुणांची ताकद

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञान, उद्योग आणि कौशल्य विकासामध्ये दक्षिण कोरियाने जगात आपली स्वतंत्र आणि मजबूत ओळख निर्माण केली आहे. भारताची तब्बल ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षाखालील असून ही तरुण पिढी देशाची खरी ताकद आहे. सध्या राज्याची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलर्सच्या घरात असून, ती १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचवण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी एका अत्यंत कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे, जी या करारांच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकेल. या करारांची लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

जागतिक रोजगार आणि तंत्रज्ञानाची दारे खुली होणार

राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या करारांचे स्वागत करताना म्हटले की, या आंतरराष्ट्रीय भागीदारीमुळे महाराष्ट्रातील तरुणांना जागतिक दजार्ची कौशल्ये, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि परदेशातील रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. तर अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी माहिती दिली की, जागतिक बँकेच्या 'कोरिया-वर्ल्ड बँक पार्टनरशिप फॅसिलिटी'च्या मदतीने राज्याच्या 'दक्ष' उपक्रमाला मोठे बळ मिळणार आहे. याच अनुषंगाने मुंबईत २१ आणि २२ मे रोजी एक दोन दिवसीय विशेष कार्यशाळाही आयोजित करण्यात आली असून, यात भारत आणि दक्षिण कोरियातील तज्ज्ञ एकाच मंचावर आले आहेत.

आजीवन शिक्षण धोरण आणि उच्च शिक्षणाच्या संधी

कौशल्य विकास सोसायटी आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर लाइफलाँग एज्युकेशन' यांच्यातील करारामुळे राज्यात 'आजीवन शिक्षण धोरण' तयार करण्यात येणार आहे. यामध्ये कामगारांच्या कौशल्यवाढीसाठी डिजिटल प्रमाणपत्र आणि ई-लर्निंगवर भर दिला जाईल. याशिवाय, रतन टाटा कौशल्य विद्यापीठ आणि कोरियन संस्था 'ग्लोबल सस्टेनेबिलिटी'वर एक संयुक्त संशोधन केंद्र सुरू करणार आहेत. या विशेष करारामुळे विद्यापीठातील निवडक प्राध्यापक, कर्मचारी आणि माजी विद्यार्थ्यांना थेट दक्षिण कोरियामध्ये पदव्युत्तर आणि पीएचडी शिक्षणासाठी जाण्याची मोठी संधी मिळणार आहे.

कोम्बींग ऑपरेशनच्या माध्यमातून ड्रग्स तस्करी संदर्भात 24 नायजेरियन नागरीक जेरबंद

■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवलीतील पलावा खोणी इथल्या उच्चभ्रू सोसायटीमधून तब्बल 24 नायजेरियन नागरीकांना पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नायजेरियन नागरिकांकडून ड्रग्स आणि अमली पदार्थांची तस्करी केली जात असल्याच्या संशयाने पोलिसांनी या नायजेरियन नागरिकांना अटक केली आहे. अटक केलेले 24 नायजेरियन नागरीक मूळचे दक्षिण आफ्रिकेतील घाणा आणि युगांडा या भागातील आहेत. तसेच अटक करण्यात आलेल्या नायजेरियन नागरिकांकडून पोलिस पुढील तपास करीत आहेत अशी माहिती पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे. ऑपरेशन कोम्बींग या अनुषंगाने ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांकडून पहाटे 3 ते सकाळी 10 वाजेपर्यंत संयुक्तरित्या ऑपरेशन राबवून ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. ऑपरेशन दरम्यान एक नाजयेरियन महिला उडी मारुन पळून जाण्याच्या प्रयत्नात होती.



ती कोणत्या रुग्णलायात उपचार घेत आहे. त्याची माहिती घेऊन तिच्या विरोधातही पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

पोलिस उपायुक्त झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या 24 नायजेरियनमध्ये 14 पुरुष 6 महिला आणि 4 मुलांचा समावेश आहे. 24 पैकी 7 जणांकडे कागदपत्रे आहेत. त्यांपैकी उर्वरीत 8 जणांकडे व्हीजा, पासपोर्ट नाही. 9 जणांच्या विरोधात न्यायालयात खटले सुरु असल्याने त्यांचे पासपोर्ट न्यायालयाकडे जमा करण्यात आले आहेत. कोम्बींग ऑपरेशन दरम्यान नवी मुंबई पोलिसांना अंमली पदार्थ प्रकरणात एक मोस्ट वाँटेड असलेले नायजेरीयन पकडण्यात यश आला आहे. त्या आरोप्याला नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या 24 जणांपैकी 9 नाजयेरियनच्या विरेधात एनडीपीएसचे गुन्हे दाखल आहेत. कोम्बींग ऑपरेशनच्या वेळी ताब्यात घेण्यात आलेल्या नायजेरियनकडे काही एक ड्रग्ज मिळून आलेले नाही. त्यामुळे त्यांचे ड्रग्ज तस्करीशी काही कनेक्शन आहे का ? या अंगाने पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे. यापूर्वीही पलावा परिसरातून 2 नाजयेरियन अटक करण्यात आले होते.

मुंब्रा, दिवा आणि पलावा परिसरात परदेशी नागरीकांना स्वस्त भाड्याच्या दराने उपलब्ध होतात. त्यामुळे त्याठिकाणी नाजयेरीयन वास्तव्याला आलेले आहेत. असे पोलिस कारवाईतून उघड झाले असून या नायजेरियन नागरीकांना घरे भाडयाने देताना त्याची माहिती घर मालकांनी पोलिसांना दिलेले होती की नाही याचाही तपास पोलिस करीत आहे. ज्या घर मालकांनी घरे भाडयाने देताना पोलिसांना माहिती दिली नाही. त्यांच्या विरोधात पोलिस कारवाई करणार आहे. याशिवाय जे कोणी प्रॉपर्टी एजंट असतील. ज्यांनी या नायजेरियनना घरे देण्यात मध्यस्थी केली असेल त्यांच्या विरोधातही कारवाई करण्यात येणार असल्याचे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले. या कोम्बींग ऑपरेशनमध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त सुहास हेमाडे आणि मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक संदीपान शिंदे यांच्यासह दोन सहाय्यक आयुक्त, 25 अधिकारी आणि 80 पोलिसांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे या अगोदर मुंबऱ्यात अशा प्रकारचा गुन्हा नाजयेरीयन माणसावर दाखल करण्यात आला आहे.

स्कूटरमधून स्क्रू ड्रायव्हर काढला आणि मानेवर केले सपासप वार

■मुंबई। प्रतिनिधी,

शिवडीमध्ये उसने घेतलेल्या पैशांवरून वाद झाल्याने एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी शिवडी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, अन्य दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

सदर घटना शुक्रवारी (22 मे) दुपारी 'मिनर्व्हा कंपाऊंड'मधील मोहन कोळी यांच्या स्टॉलसमोरील रस्त्यावर घडली. तक्रारदार खालिद रमजान हाश्मी जो सुक्या माशांचा विक्रेता म्हणून काम करतो, तो त्यावेळी आपल्या मित्रांसोबत बसून जेवण करत होता. याच दरम्यान, आरोपी जसीम सय्यद आणि समीर नासिर शेख यांच्यात उसने दिलेल्या पैशांवरून वाद सुरू झाला. बघता बघता या वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि हाणामारीत झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की, आक्रमक झालेल्या जसीमने आपल्या स्कूटरमधून एक स्क्रू ड्रायव्हर बाहेर काढला आणि समीरच्या मानेवर वारंवार वार केले. त्यावेळी जसीमच्या काही साथीदारांनी त्याला मदत केली.

मानेवर स्क्रू ड्रायव्हरचे घाव बसल्यामुळे समीर घटनास्थळीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या घटनेनंतर तक्रारदार आणि घटनास्थळी उपस्थित असलेल्या इतर प्रत्यक्षदर्शींनी जखमी समीरला उपचारासाठी तातडीने 'केईएम' रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी, तक्रारदार खालिद हाश्मी यांनी दिलेल्या जबाबाच्या आधारे शिवडी पोलिसांनी 'भारतीय न्याय संहिता' कलम 103(1) आणि 3(5) अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याच्या तपासादरम्यान, पोलिसांनी 'कफ परेड' येथील गणेश मूर्ती नगरचा रहिवासी असलेल्या 'किसान जयदीप' या एका आरोपीला अटक केली आहे. दरम्यान, या गुन्ह्यातील मुख्य आरोपी जसीम सय्यद आणि त्याचा साथीदार रिझवान समीर शेख हे सध्या फरार आहेत.



रॉन्ग कॉलच्या माध्यमातून झाली मैत्री, पुढे रूपांतर आत्महत्येत

■मुंबई। प्रतिनिधी,

सायनच्या प्रतीक्षा नगरमध्ये माणुसकीला हादरवणारी घटना घडली आहे. एका रॉन्ग कॉलमुळे झालेल्या मैत्रीचे परिणाम एका महिलेच्या जिवावर बेतले आहे. पोलिसांनी संदर्भात ब्लैकमेलिंग प्रकरणी तेलंगणा येथील 46 वर्षीय लेबर कॉन्ट्रॅक्टर श्रीनिवास शिवा रेड्डीला अटक केली आहे. रेड्डीला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार आठ महिन्या अगोदर श्रीनिवास शिवा रेड्डीने या महिलेला चुकून संपर्क करण्यात आला होता. दरम्यान रॉन्ग कॉलच्या माध्यमाद्वारे दोघांमध्ये बोलणं सुरू झालं आणि पुढे त्याच रूपांतर मैत्रित झाले. बऱ्याचदा रेड्डी तेलंगणाहून महिलेला भेटायला मुंबईत यायचा अशी माहिती समोर



आली आहे. ब्लॅकमेल प्रकरणी आत्महत्येमुळे सगळ्या परिसरात खळबळ उडाली आहे.

महिलेचा पती इलेक्ट्रिशियन असून त्याच प्रतीक्षा नगर येथे त्याचे शॉप आहे. सोमवारी (4 मे) महिलेच्या नवऱ्याला मैत्री संदर्भात माहिती मिळताच महिलेने रेड्डी सोबत संपर्क बंद केला. पुढे, रेड्डी वारंवार महिलेला कॉल करायचा मात्र महिला फोन उचलत नसल्याने. रेड्डीने महिलेचे प्रायवेट फोटो तिला पाठवत ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्याने तिचे फोटो नवऱ्याला आणि सोशल मिडियावर पसरवेन अशी धमकी दिली. वडाला ट्रक टर्मिनस पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रेड्डीच्या धमक्यांमुळे घाबरून महिला डिप्रेशन मध्ये गेली होती. आणि त्याचकारणे घाबरत तिने आत्महत्येचा पाऊल उचल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

त्या अनुषंगाने गुरुवारी (14 मे) महिलेने किटकनाशक औषध घेऊन स्वतःचे आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला. दुपारी घरी तिचा नवरा आला असता त्याला ती बेशुद्ध अवस्थेत सापडली. मात्र तिला रुग्णालयात दाखल करण्यागोदारच महिलेचा जीव गेला होता. तसेच महिलेच्या घरात तिचा नवरा 17 वर्षाचा मुलगा आणि विवाहित मुलगी राहत होती. रेड्डी काही कारणास्तव मुंबईत आला असता वडाळा टीटी पोलिसांकडून त्याला अटक करण्यात आली आहे. रेड्डीवर 108 कलम अंतर्गत कारवाई सुरू आहे.

डॉक्टरने विद्यार्थीनीला इंजेक्शन दिलं

कुटुंबिय बाहेर बसलेले असताना.., भयंकर प्रकार!

■मुंबई। प्रतिनिधी,

वैद्यकीय क्षेत्राला लाजवणारी एक अतिशय धक्कादायक घटना समोर आली आहे. हॉस्पिटल'मध्ये उपचारासाठी आलेल्या एका विद्यार्थिनीसोबत तिथल्याच एका नराधम डॉक्टरने बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपी डॉक्टरवर पीडित मुलीला उपचाराच्या बहाण्याने गुंगीचे इंजेक्शन देऊन थेट ऑपरेशन थिएटरमध्ये तिचे लैंगिक शोषण केल्याचा अत्यंत गंभीर आरोप लावण्यात आला आहे. ही संतापजनक घटना उत्तर प्रदेशातील लखनौमध्ये 18 मे रोजी घडली.

प्रकरणाचे गांभीर्य आणि संताप लक्षात घेता उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्री ब्रजेश पाठक यांनी तेजस रुग्णालय तात्काळ सील करण्याचे आदेश दिले आहे. याशिवाय नराधम आरोपी डॉक्टरची वैद्यकीय पदवी (मेडिकल डिग्री) कायमस्वरूपी जप्त करण्याचे कडक निर्देश प्रशासनाला जारी केले आहेत.

प्रकृती खालावल्यामुळे पीडित विद्यार्थिनीला उपचारासाठी तेजस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच आरोपी डॉक्टर विजय गिरी याने उपचाराचा बहाणा करून पीडित मुलीला ऑपरेशन थिएटरच्या आतमध्ये एकटे बोलावून घेतले. आरोपी डॉक्टरने आधी तिथे उपस्थित असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना (स्टाफ) आणि मुलीच्या वडिलांना खोलीच्या बाहेर जाण्यास सांगितले. सर्व जण बाहेर गेल्यानंतर आरोपीने ऑपरेशन थिएटरमध्ये एकटी असलेल्या या विद्यार्थिनीला आधी गुंगीचे इंजेक्शन दिले आणि त्यानंतर तिच्या असहायतेचा गैरफायदा घेत तिच्यावर कथितपणे बलात्कार केला.

नशील्या इंजेक्शनचा अंमल हळूहळू कमी झाल्यानंतर आणि संपूर्ण शुद्धीवर आल्यानंतर पीडित विद्यार्थिनीला आपल्यासोबत घडलेल्या या भयानक आणि अमानुष कृत्याची जाणीव झाली. तिने तात्काळ घडलेली सर्व आपबीती आपल्या कुटुंबीयांना सांगितली, ज्यानंतर संतप्त झालेल्या कुटुंबीयांनी थेट पोलीस ठाणे गाठून आरोपीविरुद्ध अधिकृत तक्रार नोंदवली. या प्रकरणाची माहिती देताना उत्तर प्रदेशच्या डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस (नॉर्थ) ट्विंकल जैन यांनी सांगितले की, पोलिसांनी या प्रकरणी योग्य कलमांखाली गुन्हा दाखल करून पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले आहे. मूळचा सीतापूर जिल्ह्यातील तंबौर परिसराचा रहिवासी असलेल्या आरोपी डॉक्टर विजय गिरी याला पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेऊन अटक केली असून, पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा अत्यंत बारकाईने तपास करत आहेत.

घर भाड्याच्या बदल्यात बायको अन् मुलगी, नवऱ्याने घरमालकाच्या हवाली केलं, भयंकर प्रकरण!

पत्नीनंतर पोटच्या अल्पवयीन मुलीलाही नराधमांच्या हवाली केले

काही दिवस हा अमानुष छळ सुरू राहिल्यानंतर नराधम घरमालकाची वक्रदृष्टी त्या कुटुंबातील चौदा वर्षांच्या निष्पाप अल्पवयीन मुलीवर पडली. यानंतर पोटच्या बापाच्या संमतीने आणि सहकार्याने त्या अल्पवयीन मुलीलाही नराधमांच्या हवसाचे शिकार बनवण्यात आले. आरोपी घरमालक आणि त्याच्या एका साथीदाराने या दोन्ही पीडित माय-लेकींना मोरबी आणि टंकारा येथील वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या घरांमध्ये नेऊन त्यांच्यावर अनेक वेळा सामूहिक बलात्कार (गँगरेप) केला. या अत्यंत लाजिरवाण्या आणि वेदनादायी घटनाक्रमाची संपूर्ण भनक जेव्हा पीडित मुलीच्या आईला लागली, तेव्हा तिने या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे ठरवले. तिने तात्काळ मोरबी पोलीस ठाणे गाठून आपल्याच पतीविरुद्ध आणि घरमालकाविरुद्ध रीतसर फिर्याद नोंदवली.

■मुंबई। प्रतिनिधी,

गुजरात मधील मोरबी परिसरातून नातेसंबंधांना आणि माणुसकीला पूर्णपणे काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक आणि सुन्न करणारी घटना समोर आली आहे. राहत्या घराचे किरकोळ भाडे अदा न करू शकल्यामुळे एका नराधम पतीने आपल्याच पत्नीच्या आणि अल्पवयीन मुलीच्या अब्रूचा सौदा थेट घरमालकासोबत केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. माणुसकीला लाजवणारा हा संपूर्ण अमानुष सौदा फक्त आणि फक्त 2,000 रुपयांच्या घरभाड्यासाठी करण्यात आला होता. या किरकोळ रकमेच्या बदल्यात आरोपी घरमालक सतत त्या निष्पाप माय-लेकीच्या अब्रूशी खेळत होता आणि त्यांच्यावर अत्याचार करत होता. या अंगावर काटा आणणाऱ्या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ पावले उचलत नराधम पती आणि घरमालक या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांच्या प्राथमिक तपासात या गुन्ह्यामध्ये एका तिसऱ्या व्यक्तीचा देखील सहभाग असल्याचे समोर आले असून, पोलीस सध्या त्याचा सर्वत्र कसून शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, हे पीडित कुटुंब मूळचे गुजरातच्या सुरेंद्रनगर येथील राहणारे आहे. सुमारे सहा महिन्यांपूर्वी हे कुटुंब उपजीविकेच्या आणि रोजगाराच्या शोधात सुरेंद्रनगर सोडून मोरबी येथे आले होते. मोरबी परिसरात आल्यानंतर त्यांनी राहण्यासाठी दरमहा 2000 रुपये भाड्याने एक खोली घेतली होती. मात्र, मोरबीमध्ये आल्यानंतरही या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारली नाही आणि सततच्या आर्थिक तंगीमुळे हे कुटुंब सलग चार महिन्यांचे घरभाडे देऊ शकले नव्हते. घरभाडे थकल्यामुळे आरोपी पतीने घरमालकासोबत मिळून एक अत्यंत भयानक आणि विदारक करार केला. भाड्याच्या पैशांची भरपाई करण्यासाठी त्याने स्वतःच्या पत्नीला घरमालकाच्या हवाली केले. यानंतर, अत्यंत शरमेची बाब म्हणजे आरोपी पतीच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच घरमालकाने त्याच्या पत्नीसोबत बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

आईच्या फियार्दीवरून पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल आणि फरार आरोपीचा शोध सुरू

पीडित महिलेची तक्रार मिळताच मोरबी पोलीस तातडीने ॲक्शन मोडमध्ये आले आणि त्यांनी आरोपींविरुद्ध अत्यंत कडक कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल केला. या छळामध्ये एका अल्पवयीन मुलीचा समावेश असल्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्यात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा म्हणजेच पॉक्सो अंतर्गत कलमे जोडली आहेत. या प्रकरणाच्या तपासाबाबत माहिती देताना डेप्युटी सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस जे. एम. लाल यांनी सांगितले की, अल्पवयीन मुलीचा पिता आणि घरमालक या दोघांनी मिळून या संपूर्ण अमानुष कारस्थानाचा कट रचला होता. पोलिसांनी या दोन्ही मुख्य आरोपींना अटक केली असून, दोन्ही पीडितांवर अनेक वेळा लैंगिक अत्याचार झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्यात सामील असलेल्या तिसऱ्या फरार आरोपीच्या संभाव्य ठिकाणांवर पोलिसांकडून सातत्याने छापेमारी सुरू असून त्यालाही लवकरच अटक केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com